महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२० २१/खातेबदल/२०२१/ १२६३ दिनांक : ०६.०३.२०२१

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
संस्था क्रमांक
**६००१, ६००६, ६००९, ६०१८, ६०२५, ६१०५, ६१२९, ६१७५, ६१७७, ६२१७, ६२७४, ६२७७, ६३१०, ६३२३, ६३५५, ६३७३, ६४२७, ६४२८, ६४४१, ६४४६, ६४५१, ६४५२, ६४६९, ६६१६, ६६२०, ६६२५, ६६३५, ६७६०, ६७६९, ६७८७, ६७८८, ६७९७, ६८२९, ६८४०, ६९०८, ६९१८, ६९२७, ६९३०, ६९३३, ६९५७, ६९६५.**

विषय : संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले बॅक तपशिल मंजूर करणेबाबत..

संदर्भ : १) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/खातेबदल/डीबीटी/२०१९/५७३ दिनांक २३.१२.२०१९.
२) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/खातेबदल/डीबीटी/२०२१/७१ दिनांक ०१.०३.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भ क्रमांक १ मधील पत्रान्वये महाडीबीटी पोर्टलवर संस्थांच्या बॅक खात्यामध्ये बदल करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतू ब-याच संस्था त्यांच्या शिष्यवृत्तीच्या बॅक खात्यामध्ये बदल करण्यासाठी संचालनालयास थेट पत्रव्यवहार करतात.

संदर्भ क्रमांक २ मधील प्राप्त झालेल्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या यादी अन्वये आपल्या संस्थेने डीबीटी पोर्टलवर बॅक खात्यामध्ये बदल करुन नवीन बॅक खाते ऑनलाईनरित्या भरुन मंजुरीसाठी ऑनलाईनरित्या पाठविण्यात आलेले आहे. परंतु संदर्भ क्रमांक १ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार आपल्या संस्थेचा विषयांकीत प्रस्ताव या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह संचालनालयास प्राप्त झालेले नाहीत. तरी या पत्राच्या दिनांकापर्यंत आपण संदर्भ क्रमांक १ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार प्रस्ताव विभागीय कार्यालयाच्या शिफारसीसह संचालनालयास सादर केले नसतील तर दि. १०.०३.२०२१ पर्यंत विहीत मार्गने सदर प्रस्ताव संचालनालयास सादर करावेत. अन्यथा मंजुरीसाठी ऑनलाईनरित्या भरलेले बॅक खाते संचालनालयाकडून नामंजूर करण्यात येईल.

**सूचना - ज्या खाजगी संस्थांना त्यांच्या शिष्यवृत्तीच्या बॅक खात्यामध्ये बदल करावयाचा असल्यास संस्थेच्या संचालक मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. संस्थेच्या संचालक मंडळाचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडले नसल्यास आपला प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात येणार नाही याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.**

**सोबत : संदर्भ क्र. १ मधील पत्र.**

(एम. आर. जाधव)
सहायक संचालक (तांत्रिक),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी- २२६१७९६९, फॅक्स - २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


FIL

ई-मेलद्वारे/स्पीड पोस्टद्वारे

क्रमांक : १८/तशिसं/खातेबदल/डीबीटी/२०१९/ ५७३

दिनांक : २४/१२/२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : संस्थांचे महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल करण्यात आलेले बँक तपशिल मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र राज्यांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना पूर्वापारपध्दतीनुसार विविध विभागांमार्फत राबविण्यात येत होत्या. सदर योजनांमध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने व योजनांचा लाभ लाभार्थ्यांच्या थेट खात्यामध्ये जाण्याच्या दृष्टीने केंद्र शासनातर्फे डी.बी.टी. पोर्टल संकल्पना राबविली. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनाकडूनही सन २०१८-१९ मध्ये ही संकल्पना राबविण्यात आली.

सन २०१८-१९ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व योजनांसाठी माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय (डी.आय.टी.) यांचेकडून, आपले सरकार महाडीबीटी पोर्टल (संकेतस्थळ: https://mahadbtmahait.gov.in ) बनविण्यात आले.

DBT अंतर्गत योजनांचा लाभ संस्था/विद्यार्थ्यांना DBT पोर्टल मार्फत देण्यात येतो. DBT पोर्टलवर संस्थाचा लाभ संस्थांना मिळण्यासाठी प्राचार्य यांच्याकडून संस्थेच्या प्रोफाईल लॉगीनमध्ये बँक खात्याची संपूर्ण माहिती भरण्यात येते. बँक खात्यामध्ये संबंधीत संस्थांची रक्कम DBT पोर्टल मार्फत त्यांच्या खात्यात पाठविण्यात येते. तसेच बँक तपशीलमध्ये ऑनलाईनबाबत बदल करण्याचे अधिकार देखील संस्थांच्या प्राचार्यांना त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये देण्यात आलेला आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत येणाऱ्या ज्या संस्थांकडून पुर्वीच्या बँक तपशिलात बदल करून DBT पोर्टलवर नवीन बँक खात्याचा तपशील भरण्यात आलेला आहे त्या बँक तपशिलात मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार डीआयटी कडून या संचालनालयाला ऑनलाईनरित्या देण्यात आलेले आहेत.

. संस्थांना बँक खात्यामध्ये जर बदल करावयाचे असतील तर त्या संस्थांनी आपल्या लॉगींन आयडी चा वापर करुन DBT पोर्टलवर ऑनलाइनरित्या बँक तपशिल भरून मंजूर करण्यासाठी संस्थांच्या लेटर हेडवर खालील तक्त्यामध्ये संस्थाच्या पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल व मंजूर/नामंजूर करण्यासाठी संस्थाकडून DBT पोर्टल वर ऑनलाइनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल बदल करायच्या कारणासह संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयार्फत जमा करावे. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय त्यांच्या शिफारशिसह संस्थेचा प्रस्ताव संचालनालयास पाठविल्यानंतर ते मंजूर/नामंजूर हे संचालनालय स्तरावर करण्यात येईल. सर्व विभागीय कार्यालयांनी आपल्या अधिनस्त येणाऱ्या संस्थांना याबाबत तसे कळविण्यात यावे.

संस्थाच्या DBT पोर्टलवर पूर्वीच्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नांव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

मंजूरीसाठी संस्थाकडून DBT पोर्टलवर ऑनलाईनरित्या बदल केलेल्या बँक खात्याचा तपशिल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | बँकेचे नांव | आय.एफ.एस.सी. कोड | बँकेचा खाते क्र. | पुर्वीच्या खात्यात बदल करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

(डॉ. अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.